राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ (१) अन्वये तक्रार

तक्रार क्र. ९९/२०२६

तक्रारकर्ता, ॲड. परवेज शेख,
ए-१/१-७, सेक्टर १८, शिवनेरी अपार्टमेंट, सेक्टर १८,
नेरुळ, नवी मुंबई - ४०० ७०६

विरुध्द

जन माहिती अधिकारी,
सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतूक विभाग) यांचे कार्यालय,
कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक	जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक	प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक	प्रथम अपिल आदेश दिनांक
१८/०२/२०२६	--	--	--

जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अर्ज स्विकारण्यास नकार दिला आहे, असे कारण नमूद करुन तक्रारकर्ता ॲड. परवेज शेख यांनी दि. २८/०२/२०२६ रोजी तक्रार अर्ज दाखल केलेला आहे.

तक्रारकर्ता यांच्या सदर तक्रार अर्जाचे अवलोकन केले असता, तक्रारकर्ता यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कलम ६ अन्वये माहिती अर्ज दाखल केला आहे, तथापि, प्रथम अपिल अर्ज दाखल केला असल्याचे दिसून येत नाही. तक्रारकर्ता यांनी संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अर्ज न करता संबंधित प्राधिकरणाच्या प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे माहिती अर्ज दाखल केला आहे. माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) अन्वये अर्जदार यांनी संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती अर्ज दाखल करणे आवश्यक आहे.

तक्रारकर्ता यांनी योग्य त्या प्राधिकाऱ्याकडे माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहिती मागणारा अर्ज दाखल केला नसल्याने या प्रकरणात पुढील चौकशीची आवश्यकता दिसून येत नाही.

आदेश

सबब सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २५ मे, २०२६

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

प्रत,

१) ॲड. परवेज शेख, ए-१/१-७, सेक्टर १८, शिवनेरी अपार्टमेंट, सेक्टर १८, नेरुळ, नवी मुंबई - ४०० ७०६
२) सहाय्यक पोलीस आयुक्त (वाहतूक विभाग) यांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४